POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२१९ ● मुंबई, मंगळवार, ११ मार्च २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# कोणतीही करवाढ नाही... महाराष्ट्र आता थांबणार नाही... विकास आता लांबणार नाही...

**■मुंबई। प्रतिनिधी :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तसेच वित्त आणि नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही...' असे सांगत शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा ११ वा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला.



उपमुख्यमंत्री तसेच वित्त व नियोजमंत्री अजित पवार यांनी वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प आज विधानसभेत सादर केला. अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांचे स्मरण केले. शिखांचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर यांच्या हौतात्म्याचे हे ३५० वे वर्ष आहे. स्वराज्य सौदामिनी महाराणी ताराबाई यांचे हे त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीवर्ष आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष आहे. देशातील लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या आपल्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. याचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला.

राज्यात गुंतवणुकीला पोषक वातावरण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याद्वारे येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबतची अभय योजना उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली. सदर अभय योजनेचे नाव ''महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यानी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, २०२-५'' असे असून या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्याच्या दिनांकापासून दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असेल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

## फडणवीस सरकारचा अर्थसंकल्पाचे ठळक वैशिष्ट्ये

- राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरले आहे. तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. सन २०२५-२६ ची राजकोषीय तूट १ लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे.
- आर्थिक सुधारणांच्या माध्यमातुन, भांडवली खचार्तील वाढीद्वारे विकासचक्रास चालना देऊन राज्याच्या विकास दरात वाढ करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्याचे प्रयत्न आहेत. मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था १४० बिलीयन डॉलर वरुन सन २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर तर सन २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे. मुंबई महानगर प्रदेशात हाती घेण्यात आलेल्या विविध पायाभूत सुविधांची कामे जसे की वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, बुलेट ट्रेन, मल्टीमोडल कॉरीडॉर, भुयारी मार्ग, मेट्रो प्रकल्प यामुळे हे क्षेत्र विकासाचे केंद्र ठरणार आहे.
- विकसित भारत- विकसित महाराष्ट्र ही संकल्पना साध्य करण्याकरीता ह्लमेक इन महाराष्ट्रह्व व्दारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगीक धोरण आखण्यात येणाार आहे. पुढील पाच वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपायांची गुंतवणुक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षीत आहे.
- कृषी क्षेत्राच्या गेल्या वर्षीच्या निराशाजनक ३.३% विकास दराच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना विविध योजना, कार्यक्रमांच्या माध्यमातुन आर्थिक सहाय्य दिल्यामुळे सन २०२४-२५ मध्ये कृषी क्षेत्राचा विकास दर ८.७% पर्यंत सुधारला. या विकास दरात सातत्याने वाढ करण्याकरीता शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती उत्पादनात मूल्यवर्धन, सिचंन सुविधा, वीजेची गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येतील.
- केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राज्यास अधिकाअधिक केंद्रीय निधी प्राप्त व्हावा म्हणून विशेष प्रयत्न करण्यात येतील.
- वस्तु व सेवा करातुन राज्यास होणाऱ्या उत्पन्नात दरवर्षी सुमारे १२ ते १४ टक्के एवढी वाढ होत आहे.
- महत्वाकांक्षी योजनांना निधीचा सुरळीत पुरवठा होण्याकरीता केंद्रीय सहाय्य, आतंरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून सहाय्य , सार्वजनिक मालमत्तेचे मुद्रीकरण, योजनांचे सुसूत्रीकरण तसेच पायाभूत सुविधा गुंतवणूक न्यास सारखे नाविण्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.
- राज्यातील महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस वाहतूक, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे.
- दर्जेदार ग्रामीण रस्ते तसेच राज्य महामार्ग व जिल्हा रस्त्यांना सर्वाधिक आर्थिक पाठबळ देण्यात येत आहे.
- सर्वांसाठी घरे हे उद्दीष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ग्रामीण घरकुलांसाठी 15 हजार कोटी तर शहरी आवास योजनांसाठी ८ हजार १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- नव्याने जाहीर केलेल्या योजनांसाठी पुरेशा तरतुदी केलेल्या आहेत. राज्याच्या वार्षिक योजनेत ६२ हजार ५६० कोटीची म्हणजेच सुमारे ३३ टक्के इतकी भरीव वाढ करण्यात आली असून अनुसूचीत जाती घटक योजनेच्या तरतुदीत ४२ टक्के, आदिवासी घटक योजनेच्या तरतुदीत ४० टक्के वाढ करण्यात आली आहे.
- राज्यात सध्या राबविण्यात येत असलेल्या योजनांचे मुल्यमापन करुन त्यांचे सुसूत्रीकरण तसेच साधनसंपत्तीच्या स्त्रोतांचा अभ्यास करुन त्यामध्ये वाढ करण्याचे उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत.
- थेट लाभार्थी हस्तांतरण (डीबीटी) सर्व वैयक्तिक लाभार्थी योजनांची अंमलबजावणी गतिमान, कार्यक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी डीबीटी पध्दत राबविण्यात येत आहे. दिनांक १ एप्रिल २०२५ पासून अशा वैयक्तिक लाभार्थी योजनांचा लाभ केवळ डीबीटी द्वारे देण्यात येईल.
- राज्याच्या सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पाठबळ देण्यात येत आहे अर्थसंकल्पात विविध स्मारके, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटनस्थळ विकसित करण्याच्या विविध प्रकल्पांना भरीव तरतुद करण्यात आली आहे.
- राज्यातील जलपर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.
- क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि खेळाडूंना पाठिंबा देण्यासाठी धोरणे आणि अर्थसंकल्पीय तरतुदी करण्यात आल्या आहेत.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीत स्मार्ट पीडीएस आणि ब्लॉक चेन तंत्रज्ञानाद्वारे अधिक पारदर्शकता आणण्यात येणार आहे.
- आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या पार्श्वभूमीवर सहकार क्षेत्रातील महाराष्ट्राचे नेतृत्व अधोरेखित करण्यासाठी विविध महोत्सव व कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.
- राज्याचे सार्वजनिक आरोग्य धोरण आखण्यात येवून प्रत्येक व्यक्तीला 5 किलोमीटरच्या परिघात दजेर्दार प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अमंलबजावणी करण्यात येणार असून मुलींचा व्यावसायीक शिक्षणात सहभाग वाढविण्या करीता शिक्षण व परिक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे.
- कायदेशीर खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील न्यायालयांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे.

# तब्बल अकरावेळा अर्थसंकल्प मांडणारे महाराष्ट्राचे पहिले अर्थमंत्री

**■मुंबई। प्रतिनिधी :**

अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या राज्याचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. नव्या सरकारचा हा पहिला अर्थसंकल्प असणार आहे. विशेष म्हणजे अर्थमंत्री म्हणून अजित पवार उद्या अकरावा अर्थसंकल्प सादर करतील. तब्बल अकरावेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडणारे ते महाराष्ट्राचे पहिलेच अर्थमंत्री ठरणार आहेत. राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी ते अर्थसंकल्पात काय तरतुदी करणार आहेत, याकडे राज्याचं लक्ष लागलं आहे.

### अजित पवार विक्रमाच्या वाटेवर

उपमुख्यमंत्री अजित पवार हे उद्या त्यांचा अकरावा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. शेषराव वानखेडे यांनी १३ वेळा अर्थसंकल्प सादर केला होता. यांच्यानंतर अजित पवार दुसरे सर्वाधिक म्हणजेच ११ वेळा अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री ठरतील. शेषराव वानखेडे यांनी १३ वेळा, अजित पवार यांनी उद्याचा अर्थसंकल्प धरून ११ वेळा, त्यांच्यानंतर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा मान जयंत पाटील यांना मिळाला. त्यांनी १० वेळा



अर्थसंकल्प सादर केला. तर सुशीलकुमार शिंदे यांनी ९ वेळा अर्थसंककल्प सादर केला.

शेतकरी, कष्टकरी, महिला, दलित, आदिवासी, विद्यार्थी, युवक हे घटक त्यांच्या अर्थसंकल्पाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. २०२१ चा अर्थसंकल्प ८ मार्च जागतिक महिला दिनी जाहीर करताना त्यांनी तो राज्यातील महिला शक्तीला समर्पित केला होता. २०२२ चा अर्थसंकल्प स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतीदिनी ११ मार्च रोजी सादर केला होता. तो छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग, समर्पण, स्वराज्यनिष्ठेला समर्पित होता.

कृषी, उद्योग, दळणवळण, आरोग्य, मनुष्यबळ विकास या पंचसूत्रीवर आधारीत अर्थसंकल्पही त्यांनी सादर केला आहे. मागील वर्षीचा निवडणूकपूर्व अर्थसंकल्प सर्वसमावेशक, क्रांतीकारी अर्थसंकल्प होता. महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आणण्यात त्या अर्थसंकल्पातील लोकोपयोगी, लोकप्रिय निर्णयांचा महत्वाचा वाटा होता. उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाकडून राज्यातील जनतेला अनेक अपेक्षा असून अजित पवार त्या अपेक्षांवर खरे उतरतील, हा विश्वासही जनतेच्या मनात आहे.

अजित पवार हे आर्थिक शिस्तीचे कठोर प्रशासक म्हणून ओळखले जातात. जनमताची नाडी ओळखून अर्थसंकल्पात लोकाभिमुख निर्णय जाहीर करताना राज्याच्या विकासप्रक्रियेला धक्का बसणार नाही याची काळजी ते घेत असतात. विकासयोजनांना निधी उपलब्ध करुन देण्यात तसेच पायाभूत विकासाची प्रक्रिया गतिमान ठेवण्यात ते सातत्याने यशस्वी ठरले आहेत. कोविडच्या संकटकाळात अनेक राज्यांची अर्थव्यवस्था अडचणीत असताना अजित पवार यांनी महाराष्ट्राची आर्थिक शिस्त बिघडू दिली नव्हती, त्याबद्दल त्यांच्या कायार्चा केंद्रीय पातळीवर गौरव झाला आहे.

# बीडचा खोक्या गेला कुणीकडे? अनधिकृत ग्लास हाऊसवर हातोडा कधी?




**■मुंबई। प्रतिनिधी :**

सतीश भोसले उर्फ खोक्यावर शिरूर पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल झालेत. गुन्हे दाखल झाल्यापासून गेल्या चार दिवसांपासून खोक्या फरार आहे. खोक्याला पकडण्यात पोलिसांना अद्यापही यश आलेलं नाहीय. त्यामुळे खोक्याच्या मुसक्या कधी आवळल्या जाणार याची चर्चा सुरू झालीय.बुलढाणा जिल्ह्यातील एका व्यक्तिला मारहाण केल्या प्रकरणी बीडच्या सतीश भोसले उर्फ खोक्या विरोधात दोन गुन्हे दाखल करण्यात आलेत. एका व्यक्तीला बॅटने मारहाण करतानाचा व्हिडिओ समोर आल्यानंतर गुंड खोक्यावर हे गुन्हे दाखल झालेत.. यात पोलिसांनी स्वतः फियार्दी होत पहिला गुन्हा नोंदविलाय. तर बावी परिसरात ढाकणे पिता पुत्राला मारहाण केल्याप्रकरणी खोक्यावर दुसरा गुन्हा दाखल करण्यात आलाय.. मात्र गुन्हे दाखल होऊन चार दिवस झाले तरी खोक्याला पकडण्यात पोलिसांना यश आलेलं नाहीय..शिरूर पोलीस ठाण्याची दोन पथकं खोक्याला पकडण्यासाठी रवाना झालीयत.. मात्र खोक्या पोलिसांच्या हाती लागलेला नाहीय.. व्हायरल झालेल्या मारहाणीच्या व्हिडिओ प्रकरणात खोक्यावर शिरूर पोलिसांत २ गुन्हे दाखल आहेत. मात्र याआधीही खोक्यावर अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आलीय..

### आतापर्यंत खोक्यावर किती गुन्हे दाखल?

- शिरूर - एका व्यक्तीला बॅटने मारहाण केल्याप्रकरणी २ गुन्हे
- शेवगाव - कौटुंबिक हिंसाचार आणि सदोष मुष्यवधाचा गुन्हा
- पाटोद्यातील अमळनेर - खुनाचा प्रयत्न, मारहाण, घातक शस्त्राने मारहाण, बेकादेशीर जमाव जमवून दंगा घडवून आणण्याचा गुन्हा
- नेवासा - सदोष मनुष्यवध, दंगा घडवून आणण्यासंदर्भात गुन्हा
- पाथर्डी - अपहरणाचा गुन्हा

शिरूर - घातक शस्त्राने मारहाण, बेकादेशीर जमाव जमवून दंगा घडवून आणण्यासंदर्भात गुन्हा

असे एक ना अनेक गंभीर गुन्हे आतापर्यंत सतीश भोसले उर्फ खोक्यावर दाखल आहेत.बॅटने मारहाण केल्या प्रकरणी चार दिवसांपूर्वी गुन्हा दाखल झालाय. मात्र या आधी खोक्यावर जे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल होते त्यावर खोक्यावर का कारवाई केली गेली नाही? एवढे गंभीर गुन्हे दाखल असतानाही खोक्या मोकाट का फिरत होता? सोशल मीडियावर शोबाजी करणारा खोक्या पोलिसांना कसा सापडला नाही.असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होताहेत. आता चर्चा झाल्यानंतर आणि माध्यमांनी विषय उचलून धरल्यानंतर पोलिसांची धावपळ सुरू झालीय. मात्र चार दिवस खोक्या पोलिसांच्या हाती सापडले नाहीय. त्यामुळे खोक्या गेला कुठे असा प्रश्न उपस्थि होतोय. खोक्या अनेक वर्षांपासून वनविभागाच्या जागेवर अतिक्रमण करून वास्तव्यास होता. वनविभागाच्या जागेवर त्याने एक ग्लास हाऊस उभारलंय. त्याचे एक एक कारनामे समोर आल्यानंतर वनविभाग आणि पोलिसांच्या तपासात ही माहिती समोर आली. खोक्या भाई रहात असलेल्या परिसरात वनविभागाने कारवाई करत अतिक्रमण उठवले. इतरांच्या झोपड्या वनविभागानं हटवल्या. खोक्याच्या ग्लास हाऊसवर मात्र अद्यापही कारवाई करण्यात आलेली नाहीय.

### खोक्याच्या ग्लास हाऊसवर हातोडा कधी?

खोक्या राहत असलेली शिरूर तालुक्यातील झापेवाडीची जागाही वनविभागाची आहे. खोक्या अनेक वर्षांपासून वन विभागाच्या हद्दीत अतिक्रमण करून वास्तव्याला होता. खोक्यासह त्याचं कुटुंबही इथेच वास्तव्याला होतं. अनेक वर्ष वनजमिनीत अतिक्रमण असूनही वनविभागाने कारवाई का केली नाही? असा प्रश्न विचारला जातोय.सर्वसामान्यांनी वनविभागाच्या नियमांचं उल्लंघन केलं तर वनविभागाकडून तत्काळ कारवाई करण्यात येते. मात्र खोक्यावर एवढ्यावर्षांपासून का कारवाई केली गेली नाही असा सवाल आता उपस्थित होतोय. तर वनविभागाने तक्रार केल्यास कारवाई करू असं शिरूर पोलिसांनी म्हटलंय. एवढ्या वर्षात वनविभागाने खोक्याला अभय दिलं होतं का? की जाणिवपूर्वक डोळेझाक केली हा प्रश्न निर्माण होतोय. खोक्याचे एवढे कारनामे समोर येऊनही अद्याप त्याचा क्लास हाऊसवर कारवाई करण्यात आलेली नाहीय. वन विभाग खोक्याच्या क्लास हाऊसवर हातोडा कधी टाकणार असा प्रश्न उपस्थित केला जातोय.

# कोकण विभागीय अधिस्वीकृती समिती अध्यक्ष पदी श्री. मनोज जालनावाला यांची नियुक्ती



**■नवी मुंबई। प्रतिनिधी :**

राज्य अधिस्वीकृती समितीच्या दि.०९ मार्च २०२५ रोजी झालेल्या बैठकीत अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदू जोशी यांनी कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार मनोज जालनावाला यांची निवड करण्यात येत असल्याचे जाहीर केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील विशेष समिती कक्षात ज्येष्ठ पत्रकार यदू जोशी यांच्या अध्यक्षतेखाली माहिती व जनसंपर्क महासंचालनालय कोकण विभागाच्या वतीने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक, आमदार मंदाताई म्हात्रे, नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, महानगरपालिकेचे शहर अभियंता शिरीष आरदवाड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तसेच राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदू जोशी, समितीचे सचिव तथा संचालक (वृत्त व जनसंपर्क) दयानंद कांबळे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागूल, छत्रपती संभाजीनगर चे संचालक किशोर गांगुर्डे, नागपूर विभागाचे संचालक डॉ.गणेश मुळे व इतर समिती सदस्य आणि अधिकारी उपस्थित होते.

कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे यापूर्वीचे अध्यक्ष श्री. श्रीकांत चाळके यांनी वैद्यकीय कारणास्तव त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्ष पदासाठी अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या सवार्नुमते श्री.मनोज जालनावाला यांना कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष म्हणून जाहीर करण्यात आले.

यावेळी या बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांच्या हस्ते श्री. मनोज जालनावाला यांचा सत्कार करण्यात आला. नवनियुक्त अध्यक्ष श्री. मनोज जालनावाला यांचे संपूर्ण कोंकण विभागातर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे.





संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# आर्थिक संकटाची चाहूल

राज्यांवर कर्जाचा डोंगर उभा राहिला आहे. उत्पन्न व भांडवली खर्चाचा ताळमेळ राखणे राज्य सरकारच्या आवाक्याबाहेर गेले आहे. उत्पन्नापेक्षा खर्चात वाढ होत असल्याने पैसा आणायचा कुठून या प्रश्नांमुळे राज्य सरकारच्या चिंतेत भर पडणे स्वाभाविक आहे. दिवसेंदिवस राज्यावर वाढत जाणारा कजार्चा डोंगर ही भविष्यातील आर्थिक संकटाची चाहूल आहे, हे राज्यकर्त्यांनी ओळखले पाहिजे. राज्याची लोकसंख्या १२ कोटींच्या घरात पोहोचली आहे. देशात सर्वाधिक कर हा महाराष्ट्रातून जातो. त्यामुळे मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात याच राज्यातील जनतेच्या मापक अपेक्षा; मात्र सत्ता काबीज करण्यासाठी निवडणुकीत घोषणा, आश्वासने देण्यात राजकारणी धन्यता मानतात. राज्याची तिजोरी आर्थिक भार पेलवणार का, घोषणांची अंमलबजावणी करण्याइतका तिजोरीत पैसा आहे का, याचा विचार सत्तेत असलेल्या प्रत्येक पक्षाने करणे काळाची गरज बनली आहे. सत्ता येते सत्ता जाते, मात्र जनतेचा सेवक म्हणून लोकप्रतिनिधींनी जबाबदारी पार पाडताना राज्याची आर्थिक कोंडी तर होणार नाही, याचा विचार करणे ही तितकेच गरजेचे आहे. विधानसभा निवडणुकीआधी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली आणि निवडणुका जाहीर होण्याआधी योजनेची अंमलबजावणी करण्यासही सुरुवात केली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत आतापर्यंत सात हप्ते पात्र महिलांच्या बँक खात्यात जमा झाले; मात्र विधानसभा निवडणुकीत १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देणार, असे आश्वासन महायुतीने राज्यातील लाडक्या बहिणींना दिले; मात्र राज्याची आर्थिक स्थिती खालावल्याने १५०० रुपये लाडक्या बहिणींना देणे महायुतीसाठी डोईजड होऊ लागले आहे. त्यामुळे निवडणुकीत घोषणा करण्याआधी राज्यातील आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे तितकेच गरजेचे आहे. महायुती सरकारने निवडणुकीत योजनांची घोषणा केली; मात्र घोषणांची अंमलबजावणी करणे हाताबाहेर जात आहे. मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे अवघड होत असताना घोषणांची पुढील पाच वर्षे अंमलबजावणी होईल की नाही, याची शाश्वती दस्तुरखुद्द महायुतीलाच नाही. त्यात दिवसेंदिवस कर्जाचा वाढता बोजा म्हणजे राज्य आर्थिक संकटात सापडले, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, वर्षाला तीन सिलिंडर मोफत, एसटीच्या प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत, लाडका भाऊ, प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना दर महिना १० रुपये, टोलमुक्त प्रवास अशा विविध घोषणा महायुती सरकारने केल्या आणि अंमलबजावणी सुरू केली. महायुती सरकारने योजनांचा पाऊस पडला त्यापैकी सर्वाधिक आकर्षित घोषणा म्हणजे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा झाली, त्याचवेळी अर्थतज्ज्ञांनी राज्य सरकारच्या तिजोरीवर भार पडणार असे संकेत दिले होते; मात्र खुर्चीच्या लालसेपोटी अर्थतज्ज्ञाच्या सूचक इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले. असो, राजकारणात सगळे काही आलबेल असे बोलले जाते. सगळ्या गोष्टींचे सोंग आणता येते, मात्र पैशांचे सोंग आणणे अशक्य गोष्ट आहे. राज्यातील अडीच कोटींहून लाडक्या बहिणींचे लक्ष २१०० रुपयांवर लागले आहे. त्यामुळे उद्या सोमवारी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार आपल्या पेठाऱ्यातून लाडक्या बहिणींना काय खुशखबर देणार हे उद्याच स्पष्ट होईलच; मात्र वित्तमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करण्याआधीच राज्याच्या आर्थिक स्थितीचा लेखाजोखा आर्थिक पाहणी अहवालातून जनतेच्या समोर मांडला. आर्थिक पाहणी अहवालातून राज्याच्या आर्थिक स्थितीची बेरीज-वजाबाकी जनतेच्या समोर आल्याने राज्याच्या आर्थिक स्थितीची वाटचाल कुठल्या दिशेने सुरू आहे, याचे उत्तर आर्थिक पाहणी अहवालातून मिळाले आहे. त्यामुळे भविष्यात राज्याची आर्थिक घडी बसवण्यासाठी राज्यकर्त्यांनी योजनांची घोषणा करण्याआधी राज्यातील तिजोरीची काय स्थिती याकडे पाहणे गरजेचे आहे. शेती, ऊर्जा, वीजनिर्मिती, रस्तेबांधणी, शिक्षण, थेट परकीय गुंतवणूक, स्टार्टअप आदी गोष्टींत काहीसा दिलासा मिळाला आहे; मात्र गेल्या काही वर्षांत वातावरणीय बदलामुळे पाऊसही लहरी झाला आहे. त्यामुळे अवकाळी पावसाचे प्रमाण वाढले असून, यामुळे शेतपिकांना मोठा फटका बसत आहे. पिकांना नुकसान म्हणजे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान हेही आलेच. बळीराजा जगला, तर देश टिकला यासाठी आर्थिक स्थिती सुधारते तोपर्यंत तरी काहीशा योजनांची घोषणा न केलेलीच बरी. जनतेच्या मूलभूत सुविधांवर खर्चाची पूर्तता केल्यास नक्कीच महाराष्ट्राला चालना मिळेल, यात दुमत नाही. त्यामुळे दूरदृष्टीने ठेवून राज्यकर्त्यांनी घोषणा केली, तर खर्चाचा ताळमेळ राखणे शक्य होईल, अन्यथा खुर्चीसाठी घोषणा करायची आणि घोषणांची अंमलबजावणी करताना हात आखडता घेणे याचा अर्थ राज्य आर्थिक संकटात झोकले जात आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यावर प्रत्येक कुटुंबप्रमुख नियोजनबद्ध घराची स्थिती हाताळतो. आर्थिक स्थितीत सुधारणा होईपर्यंत काटकसर हा पर्याय निवडतो. निवडणुकीत कुठलाच मतदारराजा घरबसल्या पैसे द्या, अशी मागणी करत नाही; मात्र खुर्चीसाठी काही पण असा राज्यकर्त्यांचे राजकारण सुरू आहे. त्यामुळे २० टक्के राजकारण, तर ८० टक्के समाजकारण याला राजकारण्यांकडून हरताळ फासला जात आहे. जनतेसाठी काय पण अशी ओरड करणाऱ्या राजकीय पक्षांनी राज्याच्या तिजोरीत खडखडाट झाला आहे का, याचा आढावा घेत पुढील घोषणा, निर्णय घ्यावेत अन्यथा महाराष्ट्राची आर्थिक कोंडी वाढेल आणि याला सर्वश्री राज्यकर्ते जबाबदार असतील.

# स्त्री हिंसेचा वाढता आलेख

**आजच्या समाजात स्त्रियांवरील वाढत्या हिंसेच्या घटना मनाला अस्वस्थ करणा या आहेत. बलात्कार, शोषण, अन्याय आणि हिंसाचाराच्या विरोधात स्त्रिया मोठ्या प्रमाणावर एकत्र येत नाहीत, ही चिंताजनक बाब आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करताना स्त्रियांनी भूतकाळातील संघर्षांची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. पितृसत्ताक समाजव्यवस्थेमुळे प्रत्येक स्त्रीला दुय्यम वागणूक मिळते. जाती, धर्म, राजकीय स्वार्थ आणि अंधश्रद्धा यामुळे स्त्रियांचे शोषण अधिक गडद झाले आहे. त्यामुळे शिक्षण, आत्मभान आणि संघटन शक्ती वाढवून स्त्रियांना या अन्यायाविरोधात उभे राहावे लागेल. समाजात खरी समता निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्न करणे गरजेचे आहे.**

आज आपण जेव्हा आपल्या देशातील स्त्रियांवरील बलात्काराच्या, हिंसेच्या, शोषणाच्या घटना वाढत असताना पाहतो, तेव्हा मनात प्रचंड अस्वस्थता निर्माण होते. ही अस्वस्थता आणखी वाढते जेव्हा स्त्रियांवरील होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात लढण्यासाठी, निषेध करण्यासाठी स्त्रिया मोठ्या प्रमाणावर एकत्र येत नाहीत. आज ज्या स्त्रिया ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करतात त्यामागे जगभरातील स्त्रियांनी माणूस म्हणून सन्मान व समानतेचा हक्क मिळवण्यासाठी मोठा लढा दिला हे विसरले जाते का? असा प्रश्न पडतो.

पुरुषप्रधान व्यवस्थेत अपमान, अन्याय, हिंसा, दुय्यम वागणूक प्रत्येक स्त्रीच्या वाटेला कधी ना कधी येतेच. यातून कोणत्याही स्त्रीची सुटका झालेली नाही. त्यामुळे अन्यायाविरोधात लढण्यासाठी वैयक्तिक आणि सामूहिक अशा दोन्ही पातळ्यांवर लढा देण्याची आजही प्रचंड गरज आहे. आज आपण पाहतोय की, ८ मार्च महिला दिन ठिकठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम घेऊन साजरा केला जातो. महिलांचे सत्कार केले जातात. गृहिणी असलेल्या महिलाही आपापल्या परीने ८ मार्च साजरा करतात किंवा किमान एकमेकींना शुभेच्छा तरी देतात. पण केवळ एक दिवस महिला दिन साजरा केला आणि महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या की, परत वर्षभर वाटेल, तसे वागायला पुरुषांना मोकळीक मिळते का? असे आजूबाजूची परिस्थिती पाहिल्यावर वाटते. दररोजच्या बातम्या पाहिल्यावर आपल्याला हादरवून टाकणाऱ्या अंगावर काटा आणणाऱ्या अशा कितीतरी बलात्काराच्या, स्त्री हिंसेच्या बातम्या आपण वाचतो म्हणजे हे प्रमाण दिवसेंदिवस कमी होणे अपेक्षित आहे, पण उलट वाढतच आहे. स्त्री हिंसा का वाढत आहे? त्याची अनेक कारणे आहेत, त्यापैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या समाजात परधमार्तील, परजातीतील पुरुषांना धडा शिकवण्याचे साधन म्हणून स्त्रियांकडे बघितले जाते. त्यामुळे आजच्या धर्मांध राजकारणात स्त्रियांवरील हिंसेचे प्रमाण वाढत आहे. समाजात असलेली जातीव्यवस्था आणि पितृसत्ता यांमुळे स्त्रियांच्या शोषणाचे प्रश्न पूर्वीपासूनच खूप गंभीर आहेत. एका बाजूला परधर्म द्वेषातून दुसऱ्या धमार्तील स्त्रियांचा बळी घेतला जातो, तर दुसऱ्या बाजूला स्वधमार्तील स्त्रियांना गुलाम करण्यासाठी प्रयत्न केले जातात. मनुस्मृती जाळली, तरी पुन्हा पुन्हा ती लागू करण्याचे प्रयत्न होतात.

स्त्री म्हणून आवश्यक असलेल्या आत्मभानाच्या अभावात अनेक स्त्रिया अशा द्वेषपूर्ण आणि हिंसात्मक राजकारणाच्या वाहक बनतात. याची अनेक उदाहरणे आपण गेल्या दहा वर्षांत अनुभवली आहेत. देशात कुठेही बलात्काराची घटना घडली की, सर्वात पहिल्यांदा ती स्त्री कोणत्या जाती-धमार्ची आहे याचा विचार अनेक जण पहिल्यांदा करतात.

एकीकडे स्त्रियांवरील अत्याचारात वाढ होत असताना त्या विरोधात बोलणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी झाली आहे. त्याची काही उदाहरणे म्हणजे, बिल्कीस बानोवर बलात्कार करणाऱ्या ११ आरोपींना तुरुंगातून सोडण्यात आल्यावर त्यांचे हार घालून सत्कार करण्यात आले; हे घडले तेव्हा संपूर्ण देशातील स्त्रियांनी याचा निषेध करायला हवा होता. पण तसे घडले नाही, कारण अत्याचार झालेली स्त्री ही इथल्या सत्ताधारी पक्षाच्या विरोधात लढत होती. हेच मणिपूर, कथुआ, हाथरस, विनेश फोगाट व तिच्या सहकारी खेळाडूंचा लढा यांसारख्या गंभीर प्रकरणांत अनुभवायला मिळाले. कारण अन्याय झालेली स्त्री कोणत्या जातीची आहे किंवा धमार्ची आहे की, सत्ताधारी पक्षातील पुरुषाविरोधात लढत आहे याचा विचार करून आपण निषेध करायचा की नाही हे स्त्रिया ठरवायला लागल्या. म्हणजे विवेकाची जागा अविवेकाने घेतली. धर्मांध राजकारणाने स्त्रियांना परत एकदा मागासलेल्या विचारसरणीकडे न्यायला सुरुवात केली आहे, हे खूप चिंताजनक आहे. जाती-धर्म विसरून जोपर्यंत स्त्रिया आपल्यावरील अन्यायाविरोधात एकत्र येऊन लढणार नाहीत, तोपर्यंत प्रश्न सुटणार नाहीत.

स्त्रिया अंधश्रद्धेच्याही मोठ्या प्रमाणात बळी आहेत. स्त्रिया मानसिक आधार शोधतात आणि कुठलातरी बाबा-बुवा शोधून त्याच्या नादी लागतात. तो बाबा त्यांना अमुक-अमुक करा, तुमच्या सर्व समस्या सुटतील, असे सांगतो आणि या करत राहतात आणि शोषणाच्या बळी ठरतात.

भारतात हजारो वर्षे स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले. त्यामुळे अंधश्रद्धा आणि शोषण यांच्या त्या मोठ्या प्रमाणात बळी ठरल्या आहेत. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांचे शोषण कमी व्हावे, त्यांना समता, स्वातंत्र्य, न्याय, हक्क मिळावे यासाठी प्रचंड प्रयत्न केले. कायदे तयार केले. पण आज किती स्त्रियांना त्यांनी केलेले प्रयत्न माहिती आहेत? विशेष म्हणजे या सगळ्यांनी सर्व जाती-धमार्तील स्त्रियांसाठी कष्ट घेतले. पण आजच्या धर्मांध राजकारणाच्या काळात किती स्त्रियांना याची जाणीव आहे? चळवळीत काम करणाऱ्या सर्व स्त्रियांना तरी फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांची व त्यांनी स्त्रियांना हक्क मिळवून देण्यासाठी केलेल्या कष्टांची जाणीव आहे का? की अजूनही आपल्या जातीचे हितसंबंध सांभाळण्यातच काही जणींना धन्यता वाटते? स्त्रियांमध्ये भगिनीभाव खरोखर वाढत आहे का? की अजूनही जाती श्रेष्ठतेत गुंतण्यात त्यांना मोठेपणा वाटतो?

दुसरीकडे गेल्या काही वर्षांत समाजात धार्मिक ध्रुवीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात धार्मिक उत्सव कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. स्त्रियांना या धार्मिक कार्यक्रमाला जायला घरातले कुणी थांबवत नाही. दुसरीकडे पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांची घरात प्रचंड घुसमट, गळचेपी होत असते, अशा परिस्थितीत या कार्यक्रमाच्या निमित्ताने घराबाहेर पडण्याची संधी घरात राहणाऱ्या स्त्रियांना मिळते व त्या जात राहतात. त्यामुळे शिक्षण, अभ्यास, संशोधन, वैज्ञानिक दृष्टी यापासून त्या दूर राहतात. बहुजन स्त्रियांचे प्रश्न या बाबतीत जास्त गंभीर आहेत. भारतात बहुजन जातीतील आणि खालच्या समजल्या जाणाऱ्या जातीतील स्त्रियांचे शोषण जास्त होते. अज्ञानामुळे त्याच जास्त अंधश्रद्धाळू असतात आणि शोषणाच्या बळी ठरतात. या चक्रातून स्त्रियांना बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात शिक्षणाच्या व नोकरीच्या संधी त्यांना मिळायला हव्यात. दुसरीकडे स्त्री चळवळीमध्ये सुद्धा जर वैयक्तिक हितसंबंधांचे राजकारण होत असेल व तिथेही जात-धर्म यांचा प्रभाव वाढत असेल, तर परिस्थिती अजून गंभीर होत जाणार आहे. लोकसंख्येच्या पन्नास टक्के असलेल्या स्त्रियांना शिक्षणासाठी संशोधनासाठी योग्य वातावरण देशात उपलब्ध न होता त्या फक्त धार्मिक कार्यक्रमात आणि उत्सवात गुंतवल्या जाणार असतील, तर तो देश अजून पुढची शेकडो वर्षे मागासलेल्या अवस्थेतच राहील.

पुरुषप्रधान व्यवस्था ही नैसर्गिक नाही, तर ती समाजानेच निर्माण केली आहे. त्यामुळे त्या व्यवस्थेला उगम आहे, तर त्याचा अंतही होऊ शकतो. पितृसत्तेशी लढा सोपा नाही. कारण ती हजारो वर्षे चालत आलेली व्यवस्था आहे. ही व्यवस्था पुरुषांच्या जरी जास्त फायद्याची असली, तरी ती अंतिमतः पुरुषांचेही नुकसानच करते. स्त्री-पुरुष जेव्हा एकमेकांना सन्मानाने, समतेने वागवतील तेव्हाच ते आनंदात राहू शकतील. त्यामुळे समाजातील जातीच्या धर्माच्या लिंगाच्या आधारे होणारे सर्व प्रकारचे शोषण संपवण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत.



# गरज राजकारणातील प्रवृत्तीशी लढण्याची!

**राजकारण हा केवळ सत्तेचा खेळ नाही, तर त्यामागे असलेल्या प्रवृत्तींचा आरसा आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याने केवळ एका नेत्याचे भविष्य ठरले नाही, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेतील गूढसाखळी उघडी पडली आहे. बीड जिल्ह्यात घडलेल्या घटनांनी राजकीय व्यवस्थेतील सत्ता-संपत्तीची लालसा आणि गुन्हेगारीकरणाचे धक्कादायक वास्तव समोर आणले आहे. राजकीय नेते केवळ सत्ताधारी पक्षाच्या सोयीसाठी तयार होतात आणि त्यांच्याकडून समाजहिताच्या अपेक्षा अपुऱ्या ठरतात. ही समस्या धनंजय मुंडे यांच्या व्यक्तिगत कारकीर्दीपुरती मर्यादित नाही, तर ती संपूर्ण राजकीय प्रक्रियेचा भाग आहे.**



धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यामुळे एक वर्तुळ पूर्ण होत आहे. या वतुर्ळाची रेष गतवर्षी ९ डिसेंबरला संतोष देशमुख यांच्या हत्येने ओढायला सुरुवात झाली नव्हती. राजकारणाच्या अनेक फिकट रेषा असतात. एकावर एक रेषा एकत्र येऊन एक भडक रेषा तयार होऊ लागते. मग त्या वतुर्ळाची पूर्तता होत असते.

मुंडे यांच्या बाबतीत असेच काहीसे झाले. त्यांची राजकारणाची रेषा २००९ साली ओढली गेली. त्याआधी ते आपले काका गोपीनाथ मुंडे यांच्यासाठी परळी आणि बीडमध्ये काम करत होते. पण स्वतंत्र अस्तीत्व नव्हते. तरीही काकांच्या मार्गदर्शनाखाली काम करत राहिले असते, तर एवढ्या लवकर त्यांचे वर्तुळ पूर्ण झालेच नसते. पण २००९च्या विधानसभा निवडणुकीत आपल्याला डावलले जाऊन बहिण पंकजा यांना संधी मिळतेय म्हटल्यावर ते स्वतंत्र बाणा दाखवू लागले.

थोरले मुंडे अडचणीत येऊ नयेत म्हणून भाजपने त्यांना सतत चुचकारले, बंड करू नये म्हणून विधान परिषदेवर संधी दिली. अनेकांना आयुष्यभर ही संधी मिळत नाही. फार तरूण वयात मिळालेल्या संधीचे सोने करणे त्यांचा हातात होते, कोंदण भाजपचे तयार होते. पण महत्त्वाकांक्षेने उचल खाल्ली आणि अर्धे ताट भरलेले असताना अर्धे रिकामे ताट त्यांना स्वस्थ बसू देईना. ते राष्ट्रवादीत गेले. तिथे त्यांची दोस्ती जमली ती अजित पवार यांच्याशी.

अजित पवार यांचे आणि गोपीनाथ मुंडे यांचे फारसे सख्य कधीच नव्हते. मुंडे यांनी शरद पवार यांच्यावर अतिशय प्रखर राजकीय हल्ले केले. पण या दोन नेत्यांमध्ये फारच दुरावा आहे आणि ते एकामेकांना टाळतात, असे कधी दिसले नाही. पण अजित पवार त्यांच्या स्वभावानुसार वागत होते. बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी वाढवायची असेल आणि धनंजय आपल्याकडे येत असतील, तर ही संधी सोडता कामा नये, असे त्यांनी आपल्या काकांना पटवले.

त्यावेळी काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे सरकार असल्याने धनंजय म्हणतील तसे 'विकासा'चे निर्णय बीड जिल्ह्यात झाले. मूळ घरी भाजपमध्ये काहींना धनंजय यांच्याबद्दल आस्था होतीच. पंकजा यांच्यापेक्षा धनंजय कधीही उत्तम या न्यायाने त्यांना पुढे चाल मिळत गेली. विरोध झाला नाही आणि बीड जिल्ह्यात त्यांचा शब्द अंतिम मानला गेला.

आज बीडचे चित्र काय दिसते? बीड जिल्ह्यात बरोबर चाललेले नाही हे आधी लक्षात आले नव्हते? आले असेल तर अशी वाताहत कशी होऊ दिली? याला एकटे धनंजय जबाबदार आहेत? त्यांची एकहाती सत्ता या जिल्ह्याचे सामाजिक स्वास्थ बिघडवेल, असे कोणाला वाटले नसेल का, आणि वाटले असेल, तर त्यांनी आवर का घातला नाही? या दुर्लक्षाची परिणती रानटी आणि क्रूर हत्या आणि वसुलीत अडकलेला जिल्हा अशी बीडची ओळख का होऊ दिली? याची उत्तरे धनंजय मुंडे यांना राजकीय संरक्षण देणाऱ्यांनी सुद्धा दिली पाहिजेत.

खरे तर धनंजय मुंडे हे काकांप्रमाणेच राजकीय वाटचाल करतील, असे दिसत होते. काहीसा रांगडेपणा, उत्तम वक्तृत्व, ग्रामीण, निमशहरी प्रश्नांची जाण असा समुच्चय होता. पण ते चुकीच्या मार्गाने जात असल्याने राजकीय कपाळमोक्ष अटळ आहे, याचे भान त्यांना राजकीय संरक्षकांनी का करून दिले नसावे?

राजकारणात सहसा चुका निदर्शनास आणून दिल्या जात नाहीत. चुका करणारा संकटात आल्याशिवाय राजकारण होत नाही. संकटात मदत करण्याचे मोल वसूल केले जाते किंवा तो बाजूला झाला की, काहींचा रस्ता मोकळा होतो. राजकारण हा लोभसवाण्या हसूंचा, ओथंबून जाणाऱ्या भावनांचा मेळावा नाही. जे दिसते ते फारच सवंग असते. अनेक चुकांचा समुच्चय झाल्याने आज धनंजय मुंडे हा एक तरूण नेता पूर्णपणे जायबंदी झाला. आपण काहीही केले, तरी समाजाच्या पाठबळावर आणि नेत्यांच्या मदतीवर टिकून राहू या भ्रमात ते राहिले.

मुंडे यांचा निकाल तर लागला आता नंबर कोणाचा ही चर्चा सुरू झाली आहे. काही नावे पुढे येऊ लागली आहेत. राजकारण हा केवळ आपल्याला हवी तशी माणसे घडविण्याचा व अडचण झाली की, संपवण्याचा खेळ कसा असू शकतो? बीड जिल्ह्यात केवळ एका हत्येचा किंवा एका वसुली प्रकरणाचा प्रश्न नव्हता. तिथे कायदा व सुव्यवस्थाच शिल्लक नव्हती. गेल्या पाच वर्षांत खुनाच्या २७५ घटना या जिल्ह्यात घडल्या. ७६६ खुनाचे प्रयत्न झाल्याची सरकारी आकडेवारी आहे. दरवर्षी लाखो ऊस तोडणी मजूर पुरविणारा, मुंबई-पुणे-ठाणे या पट्ट्यातही कामगार पाठविणारा हा मागास जिल्हा याबाबत अग्रेसर कसा हा प्रश्न कोणाला पडला नाही? ज्यांचा राजकारणाचा संबंध नाही, अशा बीडवासीयांनी या बदनामीचा डाग का मिरवावा?

प्रश्न केवळ एकट्या बीडचा नाही. सध्याच्या राजकारणाचा आणि त्याआडून सुरू असलेल्या इतर 'लघु' आणि 'कुटीर' उद्योगांचा हा प्रश्न आहे. सरकारी कामे बळकावण्याची, विकास योजनांत हात मारण्याची हाव, वसुली, वाटा व त्यासाठी आवश्यक ते राजकीय वर्चस्व या चक्रात बरेच जिल्हे अडकले आहेत. अनेक नेते गावी राहत नाहीत, मुले देश-विदेशातल्या उत्तम संस्थांत शिकतात आणि मागास भागातील नागरिकांच्या नशिबी तुटक्या व्यवस्थेचे भोग येतात.

पूर्वी नेतृत्व चळवळीतून उभे राहत असे. लोकांचे जिव्हाळ्याचे पाणी, सिंचन, शिक्षण, आरोग्य, रोजगार या विषयांतून नेते घडत. अलीकडे पॅराशूट पद्धत आली आहे. सामान्यांमधून नेतृत्व घडवायला वेळ आहे कोणाला, म्हणून रेडीमेड माणूस शोधा व त्याला त्या जिल्ह्याची, भागाची फ्रँचायजी देण्यावर भर आहे. थेट वरून लादलेल्या नेतृत्वाला सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांची धग जाणवेल याची खात्री नाही. मागास आणि विकसनशील भागात तर नाहीच नाही.

सतत सत्तेत कसे राहतात येईल याची राजकीय पक्षांना चिंता आहे. अमुक भागातला माणूस आपल्या राजकारणासाठी पोषक ठरतोय ना मग करा त्याच्या चुकांकडे कानाडोळा असा मामला आहे. मी तुम्हाला हवे ते घडवून आणतो तुम्ही माज्या भागात, जिल्ह्यात लक्ष घालू नका, असे सांगत सवते सुभे उभे राहत आहेत. सामाजिक-आर्थिक विषमता, बेरोजगारी, महागाई या खड्डेमय रस्त्यावरून १८० च्या गतीने निघालेल्या हायफाय नेतृत्वाच्या गाड्या कुठे थांबायला तयार नाहीत. मग अपघात तर होणारच होणार. तो होऊ नये म्हणून प्रयत्न करायचा की, अशाच गतीने जाणारा नवा भिडू शोधायचा?

अशा विषयांकडे लोकांनी फार लक्ष केंद्रीत करू नये म्हणून सतत समाजपुरुष, इतिहास पुरुष, महापुरुष यांचा जयघोष सुरू ठेवायचा. भावनीक, संवेदनशील, जात, वर्गसंघर्षाचे विषय सातत्याने चर्चेत राहतील याची खबरदारी घ्यायची असा मामला आहे. एक मुंडे किंवा अन्य कोणी राजकीय पटलावरून बाजूला झाले म्हणजे हे प्रश्न सुटणारे नाहीत. प्रश्न एकाच्या वृत्तीचा नाही, प्रवृत्तीचा आहे याकडे आपण कधी पाहणार?

# परावलंबी महापालिका

राज्यातील शहरांचा आकार वाढत असताना त्या तुलनेत नागरी सुविधा पुरविण्यात महानगरपालिका कमी पडत असल्याची सार्वत्रिक तक्रार केली जाते. राज्यात २०११च्या जनगणनेनुसार ४५ टक्के नागरीकरण झाले होते. त्यानंतरचा गगनचुंबी झपाटा लक्षात घेता गेल्या दशकभरात ६० टक्क्यांच्या आसपास भागाचे नागरीकरण झाल्याची शक्यता वर्तवली जाते. मात्र त्या तुलनेत पायाभूत सुविधा पुरविण्यात स्थानिक स्वराज्य संस्था कमी पडताहेत. मुंबई, पुणे वा ठाण्यासारख्या मोठ्या महानगरपालिकांमध्ये रस्ते, पायाभूत सुविधांची कामे करण्यासाठी किमान निधी उपलब्ध असतो. छोट्या महानगरपालिकांची तर बोंबच असते.

नगरपालिकांची अवस्था आणखी वाईट. शहरांचा कारभार बघण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायती अशी त्रिस्तरीय रचना आहे. महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्या पाहिजेत, असा नेहमीचा सूर असतो. पण सध्या सर्वच स्थानिक स्वराज्य संस्था परावलंबी झाल्या आहेत. वस्तू व सेवा कर (जीएसटी) लागू झाल्यापासून जकात कर, स्थानिक स्वराज्य संस्था कर असा महानगरपालिकांचा हक्काचा आर्थिक स्त्रोत बंद झाला. जकातीमुळे पालिकांकडे रोख जमा होत असे. जकात वा अन्य कर बंद झाल्याबद्दल राज्य शासनाकडून मिळणाऱ्या नुकसानभरपाईवर महापालिका व नगरपालिकांचा कारभार सुरू आहे. मालमत्ता कर वसुलीवर सारी मदार; पण ती करणार किती? मुंबई, ठाणे, पुणे अशा मोठ्या शहरांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणांवर सुरू असलेल्या बांधकामांमुळे पालिकांच्या तिजोरीत भर पडत आहे. इमारतींच्या बांधकामाकरिता विकासकांना पालिकांना विकास नियोजन शुल्क (प्रीमियम) भरावे लागते. मुंबई महानगरपालिकेने चालू आर्थिक वर्षात ५८०० कोटींचे उद्दिष्ट ठेवले होते, पण डिसेंबरअखेर- म्हणजे एक तिमाही आधीच-त्यापेक्षा जास्त रक्कम जमा झाली. परिणामी, पुढील आर्थिक वर्षात १० हजार कोटींच्या आसपास निधी इमारतींच्या बांधकामांतून जमा होईल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मुंबई महानगरपालिका ही देशातील श्रीमंत महानगरपालिका. पण इथेही राज्य शासनाकडून मिळणारी सुमारे १४ हजार कोटींची नुकसानभरपाईची रक्कम महत्त्वाची ठरते.

मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड, नागपूर या मोठ्या महानगरपालिकांमध्येही पैसे उभे करायचे कुठून, असा प्रश्न भेडसावत आहे. दोनच दिवसांपूर्वी ठाणे महानगरपालिकेचा अर्थसंकल्प सादर करताना आयुक्त व प्रशासक सौरभ राव यांनी शासनाकडून ६०० कोटींचा निधी अपेक्षित धरला आहे. ठाण्याचे एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदी असताना शासनाकडून ठाणे महानगरपालिकेला एक हजार कोटींचा निधी देण्यात आला होता. शासनाकडून मिळालेल्या निधीमुळे प्रशासन पैसे खर्च करीत गेले. पण त्याच वेळी मालमत्ता कर किंवा अन्य वसुलीकडे दुर्लक्ष झाले. या वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकले नाही. पुढील आर्थिक वर्षात शासनाकडून ६१२ कोटी रुपये मिळतील या आशेवर पालिका प्रशासन आहे. तेव्हा एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री होते यामुळे पालिकेची चलती होती. आता शिंदे उपमुख्यमंत्री व नगरविकासमंत्री असले तरी निधी देताना त्यांच्यावरही बंधने येणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार हे प्रामुख्याने नागपूर वा पुणे, पिंपरी-चिंचवड या आपल्या प्रभाव क्षेत्राला प्राधान्य देताना ठाण्याला पूर्वीसारखा भरभरून निधी मिळण्याबाबत साशंकताच. एकीकडे कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी पुरेसा पैसा नसताना दुसरीकडे, ठाणे महानगरपालिकेच्या ३२ मजली मुख्यालयासाठी ७०० कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. ऐपत नसताना ३२ मजली मुख्यालयाचा घाट, हा निव्वळ नागरिकांकडून कररूपाने जमा होणाऱ्या निधीचा अपव्ययच मानावा लागेल. पुणे काय किंवा सोलापूर, सर्वच महानगरपालिकांचे राज्य शासनाकडे विविध मदतीचे पैसे थकले आहेत. पुणे महानगरपालिकेचे तीन हजार कोटींपेक्षा अधिक थकले आहेत.

मुळात राज्य शासनाचीच आर्थिक अवस्था फार काही चांगली नाही. शासनाला स्वतःचा गाडा हाकताना तारेवरची कसरत करावी लागते. अशा वेळी महानगरपालिकांना पैसे देणार कुठून हा प्रश्न आहेच. वाढते नागरीकरण लक्षात घेता छोट्या शहरांच्या मूलभूत गरजा तसेच नागरी सुविधा पुरविण्याकरिता राज्य शासनाकडे जमा होणाऱ्या महसुलातून ४० टक्क्यांच्या आसपास रक्कम नगरपालिकांना द्यावी, अशी शिफारस राज्य वित्त आयोगाने केली होती. परंतु प्रत्यक्षात २० ते २२ टक्केच रक्कम शासनाकडून हस्तांतरित होते, अशी वित्त आयोगाचीच आकडेवारी. यातील बहुतांशी रक्कम ही कर्मचाऱ्यांच्या वेतनावरच खर्च होते. मग शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी पैसे येणार कुठून? उत्पन्नाचे स्त्रोत आटलेले, राज्य शासनावर अवलंबून राहावे तर शासनाची आर्थिक परिस्थिती फार काही चांगली नसणे अशा दुष्टचक्रात राज्यातील महानगरपालिका अडकल्या आहेत, तोवर शहरांचे रडगाणे हे असेच सुरू राहणार.

# पेरूचे आरोग्यदायी सरबत

**साहित्य :** एक पिकलेला पेरू, दोन चमचे साखर (चवीनुसार), अर्धा इंच अद्रकाचा (आलं) तुकडा, चवीनुसार मीठ, अर्धा चमचा लिंबाचा रस, एक ते दीड कप पाणी थंड पाणी

**कृती :** पिकलेला पेरू धुवून त्याची साल काढावी. पेरूच्या फोडी करून घ्याव्यात. यानंतर या फोडी मिक्सरच्या भांड्यात टाकाव्यात. सोबत अद्रक, मीठ, लिंबाचा रस व एक कप थंड पाणी टाकून मिक्सर फिरवावे. हे सर्व मिश्रण गाळून घ्यावे... तुमच्यासाठी ताजे थंडगार सरबत तयार..



# सुंदर लिप्ससाठी टिप्स !

**आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.**

**तुम्हाला** तुमचे आकर्षण कायम ठेवायचे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या ओठांकडे लक्ष्य देण्याची गरज आहे. आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.

▮रोज ५ ते ६ ग्लास पाणी प्यायला पाहिजे. पाण्यामुळे फक्त शरीराला लागणारी पाण्याचीच पूर्ती पूर्ण होत नाही तर ओठांची नमी कायम राहते.

▮बऱ्याच लोकांना ओठांना चावायची सवय असते ती बदलायला पाहिजे. दीर्घ काळापर्यंत लिपस्टिकची चमक कायम ठेवण्यासाठी लिपस्टिक लावल्यानंतर टिशू पेपरने एक्स्ट्रा लिपस्टिक काढून घ्यावी. यामुळे लिपस्टिकची चमक पूर्ण दिवसभर कायम राहते.

▮डार्क कलरचे लिपस्टिक लिप्सला स्मॉल लूक देतात. जर तुमच्या ओठांचा आकार लहान असेल आणि त्याला मोठा लूक द्यायचा असेल तर नॅचरल कलरचे लिपस्टिक वापरायला पाहिजे.

▮जर ओठ जाड असतील तर कन्शिलर आणि फाऊंडेशनच्या मदतीने लिप्सला पातळ शेप देऊ शकता. लिप लायनरने आऊट लाइन ड्रॉ करावी आणि डार्क कलरचे लिपस्टिक त्यात भरायला पाहिजे.

▮जर लिप्सला हॉट लूक द्यायचा असेल तर स्ट्राबेरी आणि चेरी शेड्सचा लिपस्टिकसुद्धा लावू शकता.

▮ बदलत्या मोसमाचा सर्वात जास्त प्रभाव ओठांवर पडतो. म्हणून नेहमी चांगल्या कंपनीचे लिप बाम दिवसातून दोन-तीन वेळा लावायला पाहिजे.



## सोडा, पॅक्ड ज्यूस वगळून केवळ प्या पाणी

**वजन कमी होतं**

हल्लीच्या लाइफस्टाइलमध्ये सगळे वाढत असलेल्या वजनामुळे परेशान असतात. अशात वजन कमी करण्यासाठी शुगर असलेले पेय पदार्थ न पिता केवळ पाणी पिणे योग्य ठरेल. याने अधिक प्रमाणात कॅलरी बर्न होण्यात मदत मिळेल.

**चयापचय क्षमता वाढेल**

केवळ पाणी पिण्याने आपली चयापचय क्षमता वाढेल आणि यामुळे ऊर्जेचे स्तरदेखील. म्हणून दिवसभर खूप पाणी प्या. या व्यतिरिक्त अधिकाधिक पाणी पिण्याने आपल्याला ध्यान केंद्रित करण्यात देखील मदत मिळेल.

**खाण्यावर नियंत्रण**

आपली डाएट घेल्यानंतरही आपल्याला भूक जाणवत असेल तर केवळ एक ग्लास पाणी प्यावे. याने वजन नियंत्रित करण्यात मदत मिळेल. अनावश्यक कॅलरीज कमी करण्यासाठी पाणी पीत राहावे.

**विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढते**

अधिक पाणी पिण्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहते आणि वय वाढले तरी तारुण्य टिकून राहते. या व्यतिरिक्त अनेक आजार हाय ब्लड प्रेशर, हृदयासंबंधी आजार आणि अपचन सारखे आजार होण्याचा धोका टळतो.



## खानपानच्या ५ असंगत जोड्या सेवन करताना काळजी घ्या

**खाण्या-पिण्याच्या भिन्न वस्तू आरोग्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे फायदा करतात. काही पदार्थ मिसळून खाल्ल्याने फायदा होतो तर काही पदार्थ असे आहेत जे सोबत खाल्ल्याने आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. तर जाणून घ्या अशा ५ जोड्यांबद्दल, ज्याचे सेवन टाळावे.**

**आंबा आणि काकडी**

उन्हाळ्यात आंबा आणि काकडी दोन्हीचे खूप सेवन केलं जातं, परंतु जेवताना दोन्ही सोबत खाणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरतं. आंबा एक फळ आहे तर काकडी भाजी म्हणून दोघांना पचनासाठी वेगवेगळ्या एनजाइम्सची गरज भासते, अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन संबंधी समस्या होऊ शकतात.

**डेअरी प्रॉडक्ट्स आणि पालक**

पालकासह डेअरी प्रॉडक्ट्समध्ये पनीर मिसळून तयार भाजी लोकं चव घेऊन खातात. परंतु डेअरी प्रॉडक्ट्समध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात आढळतं आणि पालकात आढळणारे ऑक्सॅलिक ॲसिड शरीराला कॅल्शियम अवशोषित करण्यापासून थांबवतो. ज्यामुळे हे पदार्थ सोबत खाल्ल्याने फायदा होत नाही.

**दूध आणि डाळी**

अनेक पोषण विशेषज्ञाचे म्हणणे आहे की, दुधाचे पचन पोटाऐवजी छोट्या इन्टेस्टाइनमध्ये होतं आणि डाळीने तयार कोणते हा पदार्थ शरीर वेगळ्याने पचवतो. अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन क्रियेची गती कमी होते.

**भोजनासह फिजी ड्रिंक्स**

फिजी व कार्बोनेटेड ड्रिंक्समध्ये अती प्रमाणात साखर असते. हे भोजनासह घेतल्याने पचन प्रणाली वाईट रित्या प्रभावित होते. याने पचन क्रियेची गती कमी होते आणि सोबतच गॅस व ब्लॉटिंगसारख्या समस्या उद्भवू लागतात.

**दूध आणि अँटीबायोटिक्स**

अँटीबायोटिक औषध दुधासोबत घेतल्याने औषधांचा प्रभाव पडत नाही असे मानले जाते.

## बेबी मसाजचे फायदे माहीत आहेत का?

**मुलांच्या** सर्वांगीण विकासासाठी त्यांचा आहार, देखरेख व पोषक वातावरण आदी महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते. मात्र याव्यतिरिक्त बाळ तंदुरुस्त राहावे म्हणून बेबी मसाज लाभदायी असतो. मसाजमुळे मुलांची हाडे तंदुरुस्त होतात. शिवाय मुलाच्या बुद्धीलाही चालना मिळत असते. लहान मुलाच्या मसाजचा भारतीय आयुर्वेदातही उल्लेख आढळतो.



**मसाजचे फायदे-**

▮मसाजमुळे मुलाचे वजन वाढण्यास मदत होते.

▮दिवसभरातून किमान एक वेळा मसाज केल्याने मुलाचे स्नायू बळकट होतात.

▮मसाजमुळे मुलामधील एकाग्रता वाढते.

▮ मुलाच्या पोट व पचनक्रियेसंबंधी व्याधी दूर होतात.

▮मसाजमुळे मुले व आई यांच्यात घनिष्टता वाढीस लागते.

▮मसाजमुळे मुलांना शांत झोप लागत असते.

▮मसाजमुळे मुलाचा शारीरिक व मानसिक विकास होत असतो.

## रोज एक फळ खाण्याची सवय लावा

**ब**ऱ्याच काळापासून असे म्हटले जाते की ताजी फळे खाण्याचे फायदे खूप आहेत. यामुळेच सर्वांनी ही वस्तुस्थिती स्वीकारून आपल्या आहारात फळांचा समावेश केला आहे. फळाची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यात अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, खनिजे आणि आहारातील फायबरसारखे पोषक घटक आढळतात. यामुळे आपले शरीर मजबूत होते. फळे शरीराला चांगल्या प्रकारे कार्य करण्यास मदत करण्यासाठी विविध प्रकारचे पोषक प्रदान करतात. फळांमुळेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढते आणि आपल्या पेशींना दुरुस्तीची संधी मिळते. जरी असे खूप कमी लोक असतील ज्यांनी दररोज एक फळ खाण्याचा विचार केला असेल. चला जाणून घेऊया रोज एक फळ खाणे आरोग्यासाठी का महत्त्वाचे आहे?

- **रक्तातील साखरेचे नियंत्रण :** सर्व फळांमध्ये नैसर्गिकरित्या साखर असते. त्यात फायबर आणि पोषक घटक देखील असतात. त्यांच्यामुळे रक्तप्रवाहात साखर शोषून घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढत नाही.
- **मानसिक आरोग्य :** फळांमध्ये नैसर्गिकरीत्या काही पोषक घटक असतात, ज्यामुळे आपले मानसिक आरोग्य चांगले राहते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जामुन, जे मानसिक आरोग्य सुधारणारे फळ म्हणून ओळखले जाते.
- **वजन नियंत्रणात ठेवा :** फळांची एक चांगली गोष्ट म्हणजे त्यामध्ये कॅलरीज कमी असतात. त्यात फॅटचे प्रमाणही कमी आढळते, तर फायबर आणि पाण्याचे प्रमाण अधिक असते. यामुळेच आहारात फळांचा समावेश केल्यास वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते.
- **अँटिऑक्सिडंट्स :** फळांमध्ये अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे, तुमच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह तणावामुळेहोणारे नुकसान टाळण्याची संधी मिळते. अँटिऑक्सिडंट्स हृदयविकाराचा झटका, कर्करोग आणि न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांचा धोका देखील कमी करतात.
- **पचन सुधारते :** फळे नैसर्गिक एन्झाईम्सने भरलेली असतात. यामुळे तुमची पचनक्रिया चांगली होते. उदाहरणार्थ, अननसातील ब्रोमेलेन आणि पपईतील पपेन हे पचनासाठी चांगले असतात. हे एन्झाइम प्रथिने तोडण्यास मदत करतात.



**फेफरे (फिट्स) हा आजार आपल्या मेंदूशी संबंधित आहे. आपल्या मेंदूमध्ये अतिसुक्ष्म वाहिन्या असतात, त्यांना न्यूरॉन असे म्हटले जाते. न्यूरॉन आपापसात नेहमी संपर्कात असतात. एकमेकांना संदेशाचे आदानप्रदान करत असतात. संदेश वहन करण्याचे कार्य इतक्या प्रचंड वेगाने होत असते की, त्याने आपल्या मेंदूत रासायनिक व विद्युत तरंग निर्माण होतात. परंतु, एखाद्या संदेशाचे व्यवस्थित वहन न होता तो वाहिनीत अडकून पडतो. मेंदूचे संतुलन बिघडते व त्यामुळे आपल्याला फिट्स येतात. पण घाबरून जाऊ नका. फिट्सवर घरगुती उपचार आहेत.**

## फिट्स आल्यास घाबरू नये

**फिट्स** दोन मिनिटांपेक्षा जास्त वेळाची नसते. ती केव्हाही व कोणत्याही वयाच्या व्यक्तीला येऊ शकते. अचानक आपल्याला चक्कर येऊन आपण जमिनीवर पडतो व शुद्ध हरपते. फिट्स आल्यानंतर आपल्या हातापायात कंप निर्माण होतात. तोंडातून फेस येतो. वारंवार फिट्स येत असेल तर आपल्याला खालील टिप्स उपयोगी पडू शकतात.

▮ अक्कलकाढा १०० ग्रॅम व लिंबू सत्त १०० ग्रॅम यांचे मिश्रण मधामध्ये एकजीव करून ५ ग्रॅम प्रतिदिन सकाळी काहीही न खाण्यापूर्वी चाखल्याने फिट्स येणे कायमचे दूर होते.

▮ सालवटीचे चूर्ण एक ग्रॅम प्रतिदिन मधासोबत चाखावे. त्यानंतर दूध प्यावे. असे नियमित केल्याने जुनाट फिट्स दूर होतात.


▮ शुद्ध हरपलेल्या व्यक्तीला लसूण कुटून वास दिल्यास तो शुद्धीवर येतो.

▮ रोज ३-५ लसणाच्या पाकळ्या दुधात टाकून ते प्यायल्याने फिट्स येत नाहीत.

# आरामदायक 'ट्रेंडी' पँट

**फॅशनच्या** जगात महिलांसाठी पँटचे पुनरागमन झाले आहे. पॅरिस फॅशन शो असो की लक्मे फॅशन वीक सगळीकडे पँट्स परिधान केलेल्या मॉडेल दिसू लागल्या आहेत. एवढंच नव्हे तर फॉर्मलशिवाय याचा उपयोग कॅजुअल्समध्ये देखील होताना दिसत आहे.

सध्या कॉर्पोरेट कल्चरमुळे कपडे घालण्याच्या पद्धतीत कमालीचा बदल जाणावत आहे. मुली फॅशनसोबतच आरामालाही महत्त्व देत आहेत. म्हणूनच जीन्स-ट्राऊजरसारखे कपडे मुलींची पहिली पसंत झाली आहे. पिकनिक, आऊटिंग किंवा वीकेंडला जीन्स परिधान करताना दिसत आहेत. पण मीटिंग, कॉन्फरन्स, ऑफिशियल पार्टी किंवा सेमिनारच्या वातावरणात हे फिट बसत नाही. म्हणूनच मुलींनी आता पँट-ट्राऊजरला प्रमुख पोशाखांमध्ये सहभागी केले आहे. त्यातही विविध प्रकार आहेत. - ट्राऊजर, सिक्स पॉकेट, कार्गो, बूट कट आदी.



तुम्ही ऑफिस व्यतिरिक्त टी पार्टी किंवा डिनर पार्टीत सिल्क शर्टासोबत पँट परिधान करू शकता.

**पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसतो.**

पँट आरामदायक असल्यामुळे हल्ली मोठ्या इन्स्टिट्यूटनी शर्ट-पँट हा युनिफॉर्म म्हणून स्वीकारला आहे. एअरलाइन्स, हॉस्पिटलच्या व्यतिक्ति काही बँका आणि कॉलेजमध्ये आता मुली युनिफॉर्म म्हणून पँट-शर्ट परिधान करायला लागल्या आहेत. त्याने स्मार्टनेस वाढतोच आणि धावपळीची कामे सोपी होतात. पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसते. तसेच त्यावर बीडसची माळ, डायमंड नेकलेस किंवा नेकपीस, ब्रेसलेट, लेदर बेल्ट, कॉर्पोरेट बॅग्जपासून क्लच आणि पर्स हेही मॅच होते. पँट परिधान केल्यास लेदर शूज, सँडल, ट्रेंडी चप्पलसुद्धा परिधान शकता. त्याचबरोबर आपण पिकनिक आणि खेळण्यासाठी कार्गो किंवा सिंपल बूट कट देखील वापरू शकता.



## वेळ सत्कारणी लावा

**बयापैकी** श्रीमंत असलेल्या कुटुंबाच्या काही सवयी असतात. विशेषतः वृद्ध स्त्रियांना पेपर वाचायचा असतो. सकाळ-संध्याकाळ बाहेर फिरून यायचे असते. ठरावीक पदार्थाचा आस्वाद घ्यायचा असतो. वैयक्तिक अशी त्यांची कामे त्यांना करायची असतात. इतकेच नव्हे; तर आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठी व्यायामही करायचा असतो. तेवढे पथ्यही त्यांना पाळायचे असते. वेळच्या वेळी औषध घेणे आणि आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सोबतीला कोणी मदतनीस स्त्री मिळाली तर ती त्यांना हवी असते. ज्यांना अशा सेवेत रूची आहे, त्यांना ही कामे करता येतील.

आई-वडिलांकडे लक्ष देता यावे म्हणून काही मुले-मुली खासगीरीत्या नर्स ठेवत असतात. पण ही नर्स फक्त आरोग्याची देखभाल करते. आपण पुढाकार घेतला तर सोप्या गोष्टी करता येणे शक्य आहे.



## वाढतं वजन थांबवायचंय ? मग आहारात करा या घटकांचा समावेश

**बदलत्या जीवनशैलीमुळे वाढतं वजन ही प्रत्येकाची समस्या झाली आहे. त्यामुळे वाढलेले वजन कमी करण्याचा अनेक जण वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करत असतात. अनेक वेळा डाएट करूनही वाढलेल्या वजनाला आळा बसत नाही. अशा वेळी आहारामध्ये वजन कमी करण्यास मदत करणाऱ्या पदार्थांचा समावेश करायला हवा. या पदार्थांच्या सेवनामुळे वारंवार लागणाऱ्या भुकेला आळा बसतो.परिणामी वजन लवकर वाढत नाही. असेच काही पदार्थ रुपम सिन्हा यांनी सांगितले आहेत.**

**लाल मिरची**

रोजच्या जेवणाला झणझणीतपणा येण्यासाठी अनेक वेळा गृहिणी भाजी, आमटीमध्ये लाल मिरची किंवा लाल तिखटाचा वापर करतात. मात्र जेवणाची रंगत वाढवणारी लाल मिरची वजन कमी करण्यासाठीदेखील तितकीच उपयोगी आहे. लाल मिरचीमध्ये कॅप्सॅकीन संयुग असतात. कॅप्सॅकीनमुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. परिणामी वाढत्या वजनाला आळा बसतो.

**लसूण**

एखाद्या पदार्थाला खमंग फोडणी द्यायची असेल लसूण गरजेचाच आहे. मात्र लसणाचा उपयोग केवळ जेवणासाठीच होत नसून आजारपणातही होतो. अनेक वेळा आजारपणामध्ये लसणाचा वापर औषध म्हणून केला जातो. त्याप्रमाणेच वजन कमी करण्यासाठीदेखील लसणाचा उपयोग होतो. जेवणामध्ये लसणाचा समावेश असेल तर जेवताना पोट भरलंय ही भावना मस्तिष्कापर्यंत पोहोचवण्याचं काम लसूण करतो. त्यामुळे पोट भरल्यानंतर आपण आपोआप जेवायचं थांबवतो. त्यामुळे आहारात लसणाचा समावेश करायला हवा. त्यासोबतच रक्ताच्या गुठळ्या होण्यापासून लसूण मदत करतो. तर हृदयाचे आरोग्यही नीट राहते.

**लाल आणि हिरवी मिरची**

मसाल्याच्या पदार्थांमधील महत्त्वाचा घटक म्हणजे मिरची. लाल मिरचीप्रमाणेच सुकी लाल मिरची किंवा हिरवी मिरची यांचाही तितकाच शरीराला फायदा होतो. मिरचीमध्ये व्हिटॅमिन ए, सीसोबतच बीटा कॅरोटिन असतं. त्यामुळे योग्य प्रमाणात मिरचीचं सेवन केलं तर पचनक्रिया सुधारते आणि भूक नियंत्रणात राहते.

**दालचिनी**

भूक नियंत्रणात ठेवण्याचं महत्त्वाचं काम दालचिनी करत असते. दालचिनीमुळे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते. त्यासोबतच दालचिनीच्या सेवनामुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. दालचिनीमुळे धमन्यांचं कार्यही सुधारते आणि शरीरातील वाढलेल्या कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात आणली जाते.

**कोकम (आमसूल)**

आंबट, चटपटीत अशी चव असणाऱ्या कोकमाचे अनेक फायदे आहेत. भूक नियंत्रणात आणण्यासाठी कोकमचा उपयोग करण्यात येतो. त्यामुळे जेवणापूर्वी रोज एक कोकम खावं.



# चव वाढवणाऱ्या चक्रीफुलाचे असेही गुणकारी फायदे

**गरम मसाल्यांसाठी प्रसिद्ध असलेलं राष्ट्र म्हणजे भारत. त्यामुळे प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या स्वयंपाक घरामध्ये गरम मसाल्याचे पदार्थ हमखास आढळतात. जेवणाची चव वाढवणाऱ्या या पदार्थांपैकी काहींचा वापर आजीबाईच्या बटव्यासाठीही केला जातो. त्यामुळे चवीसोबतच हे पदार्थ गुणकारी असल्याचं दिसून येतं. मसाल्याच्या पदार्थांमध्ये महत्त्वाचा मानला जाणारा घटक म्हणजे चक्रीफूल. चक्रीफूल केवळ मसाल्याची चव वाढवत नसून त्याचे अन्यही काही गुणधर्म आहेत. इशा त्यागी यांनी चक्रीफुलाचे काही गुणधर्म सांगितले आहेत. ते पुढील प्रमाणे**

**वाढत्या वयाची लक्षणे थांबवण्यासाठी**

वय वाढायला लागलं की त्याच्या खुणा चेहऱ्यावर आपोआप दिसू लागतात. त्यामुळे अनेक वेळा तरुणी किंवा महिला प्रसाधनांचा वापर करून वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचा प्रयत्न करतात. मात्र आपल्या आहारात समावेश केलेल्या पदार्थांमुळेदेखील ही समस्या टाळता येऊ शकते. रोजच्या जेवणामध्ये वापरण्यात येणाऱ्या मसाल्यामध्ये चक्रीफूल हे महत्त्वाचं काम करत असतं. चक्रीफूल वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचं काम करतं. यामध्ये व्हिटॅमिन 'ए' आणि 'सी'चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असते. त्यासोबतच त्यात अँटीऑक्सिडंटचे गुणही असतात. चक्रीफुलामध्ये शरीरातील फ्री रॅडिकल्सला नियंत्रणात आणण्याची क्षमता असते. त्यामुळे वाढत्या वयाची लक्षणं रोखण्याचं काम चक्रीफूल करते.



**सर्दी-खोकल्यावर गुणकारी**

कोणत्याही ऋतूमध्ये होणारा आजार म्हणजे सर्दी आणि खोकला. काही जणांना थंड पदार्थांचं सेवन केल्यानंतर लगेच सर्दी-खोकल्याची समस्या निर्माण होते. अशावेळी चक्रीफूल हे फायदेशीर ठरते. चक्रीफुलामध्ये थाइमो आणि एथोल याचे गुणधर्म असतात. त्यामुळे सर्दी किंवा खोकल्यावर चक्रीफूल गुणकारी आहे. त्यासोबतच शरीरामध्ये उष्णता वाढवण्याचं काम चक्रीफूल करते.

**पचनक्रिया सुधारते**

उशिरा जेवण झाल्यामुळे किंवा एखाद्या वेळी चुकीचे पदार्थ खाल्ल्यामुळे अनेक वेळा अपचन, पोटात गॅस होणे, पोटदुखी या सारख्या समस्या निर्माण होतात. मात्र या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी चक्रीफूल फायदेशीर ठरते. चक्रीफुलामुळे पचनक्रिया सुधारते. त्यामुळे आपल्या आहारात चक्रीफुलाचा समावेश करायला हवा.

# बुडीत बँकांच्या पाच लाखांहून अधिक ठेवी असलेल्यांवर आता दुहेरी संकट

**अंबरनाथ :** भारतीय रिझर्व्ह बँकेने न्यु इंडीया सहकारी बँकेवर नुकतेच कडक निर्बंध जाहीर केल्याने ठेवीदार हवालदील झाले आहेत. ठेवीदारांना त्यांच्या कोणत्याही खात्यातून पैसे काढण्यास येते सहा महिने बंदी घातली आहे. त्यांना केवळ २५ हजारापर्यंतची रक्कम काढण्याची सवलत मिळाली आहे. परंतू ठेव विमा महामंडळ न्यु इंडिया सहकारी बँकेच्या तसेच त्याआधी बुडीत खात्यात गेलेल्या सिटी सहकारी बँकेच्या ठेवीदारांना विम्यापोटी दिल्या जाणाऱ्या आणि दिल्या गेलेल्या सर्व रकमा त्या बँकांच्या अवसायक/प्रशासकांकडून परत वसुल करणार आहे असे धक्कादायक वृत्त आहे.

नुकत्याच आरबीआयने निर्बंध लादलेल्या न्यु इंडीया बँकेच्या ठेवीदारांना त्यांच्या पाच लाखांपर्यंतच्या ठेवी विमा योजनेनुसार मे महिन्यात देण्यात येतील असे सरकारी ठेव विमा महामंडळाने घोषित केले आहे. ठेव विमा महामंडळ कायद्यानुसार सध्या भारतातील सर्व बँकांमधील ठेवीदारांच्या पाच लाख रुपयांपर्यंतच्या रकमांना विमा संरक्षण आहे. तसेच एखादी बँक बुडीत गेल्यास अथवा त्या बँकेवर रिझर्व्ह बँकेने कडक निर्बंध लादले तर ठेव विमा महामंडळाने तीन महिन्यांत त्या बँकेच्या ठेवीदारांना विम्याची पाच लाखापर्यंतची रक्कम तीन महिन्यांत परत करण्याचे या कायद्याद्वारे बंधनकारक केले आहे.

ठेव विमा महामंडळ न्यु इंडिया सहकारी बँकेच्या तसेच त्याआधी बुडीत गेलेल्या अन्य बँकांच्या ठेवीदारांना विम्यापोटी दिल्या जाणाऱ्या आणि दिल्या गेलेल्या सर्व रकमा त्या बँकांच्या अवसायक/प्रशासकांकडून परत वसुल करणार आहे असे धक्कादायक वृत्त आहे. किंबहुना ३० जानेवारी २०२५ च्या एका परिपत्रकाद्वारे ठेव विमा महामंडळाने अशा बुडीत बँकांच्या अवसायकांना/ प्रशासकांना विम्यापोटी ठेवीदारांना दिल्या जाणाऱ्या सर्व रकमा, अन्य कोणतीही देणी देण्याआधी प्राधान्याने ठेव विमा महामंडळाला परत करण्याचे बजावले आहे. ती रक्कम परत करण्यात विलंब झाल्यास त्यावर दंडात्मक व्याजासह ही विम्याची एकूण रक्कम वसूल करण्यात येईल असेही ठेव विमा महामंडळाने बजावले आहे.




### ही अन्यायकारक तरतूद केंद्र सरकारने त्वरीत रद्द करावी

यावर अधिक सखोल अभ्यास केला असता ठेव विमा महामंडळ कायद्यातच कलम २१ द्वारे अशी स्पष्ट तरतूद केल्याचे आढळून आले आहे. ही तरतूद विमा संकल्पनेलाच हरताळ फासणारी आणि ठेवीदारांच्या हिताविरुध्द असल्याचे मुंबई ग्राहक पंचायतीने केलेल्या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. अशा या विचित्र आणि ठेवीदारांवर सारासार अन्याय करणाऱ्या तरतुदीकडे मुंबई ग्राहक पंचायतीने अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे एका निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहे. ठेव विमा कायद्यातील कलम २१ अंतर्गत असलेली ही अन्यायकारक तरतूद केंद्र सरकारने त्वरीत रद्द करावी अशी स्पष्ट मागणी मुंबई ग्राहक पंचायतीने अर्थमंत्र्यांकडे केली आहे.

**मुळ संकल्पनेलाच छेद देणारी ही बाब**

मुळात विम्याची रक्कम बुडीत बँकांच्या ठेवीदारांना दिल्यावर ती सर्व रक्कम हे विमा महामंडळ त्या संबंधित बँकांकडून कसे काय परत मागू शकते? विम्याच्या मुळ संकल्पनेलाच छेद देणारी ही बाब असल्याचे मुंबई ग्राहक पंचायतीने म्हटले आहे. एकीकडून प्रिमियम वसुली आणि दुसरीकडून विम्यापोटी दिलेली रक्कमही परत वसुल करायची! ही कुठली पध्दत? ही पुनर्वसुली व्यवस्था म्हणजे खऱ्या अर्थाने विमा योजना नसून एक प्रकारची उसनवारीची योजनाच म्हणायला हवी अशी टीका मुंबई ग्राहक पंचायतीने केली आहे.

**मोठ्या प्रमाणावर नफेखोरी**

सुरवातीपासून आजवर या ठेव विमा महामंडळाने विम्यापोटी बुडीत बँकांच्या ठेवीदारांना दिलेली एकूण रक्कम केवळ १६ हजार ३२६ कोटी रुपये आहे. आणि याच महामंडळाला सर्व बँकांकडून साल २०२३-२४ या केवळ एका वर्षात विम्याच्या प्रिमियम पोटी मिळालेली रक्कम आहे ही २३ हजार ८७९ कोटी रुपये आहे. त्यावरून हे महामंडळ किती मोठ्या प्रमाणावर नफेखोरी करत आहे हे दिसून येते. एवढे असूनही हे महामंडळ बुडीत बँकांकडून विम्यापोटी ठेवीदारांना वितरीत केलेली रक्कम परत मागतेय ! आणि ती देण्यास काही कारणाने विलंब झाला तर दंडात्मक व्याजासह वसुली करतेय असे मुंबई ग्राहक पंचायतीने म्हटले आहे.

## विधानभवनात जेव्हा समोरा समोर आले ठाकरे, शिंदे, फडणवीस...

# एकाचा नमस्कार, दुसऱ्याने पाहिलं पण नाही

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर महायुती सरकारच्या पहिल्याच अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा समोरा समोर आले. मात्र, यावेळी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंकडे पाहिले देखील नाही. तर, देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरेंमध्ये हस्तांदोलन झाले. राजकीय वतुर्ळात या भेटीची जोरदार चर्चा रंगली आहे.

अधिवेशनाच्या निमित्ताने प्रथमच उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांचा विधानभवनात आमना सामना झाला. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस हे दोघे सोबतच होते यावेळी त्यांच्या समोर उद्धव ठाकरे आले. उद्धव ठाकरे यांनी हात जोडून नमस्कार केला. यावेळी उद्धव ठाकरे आणि फडणवीसांची धावती भेट जाली. फडणवीस आणि उद्धव ठाकरेंमध्ये हस्तांदोलन देखील झाले. मात्र, एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंकडे बघणं टाळलं.

एकनाथ शिंदे यांच्या देहबोलीवरुन भविष्यात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात जवळीक होणे अशक्य असल्याची चर्चा रंगली आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरे आणि देवेंद्र यांच्यातील जवळीक वाढत असल्याचे दिसत आहे. यापूर्वी देखील उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची भेट झाली होती. उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक देखील केले होते.



### आदित्य ठाकरेंनी केली एकनाथ शिंदेंची नक्कल

आदित्य ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची नक्कल करत, मुंबईतील खड्डयांवरुन त्यांना टोला लगावला. त्यांचं मुख्यमंत्रिपद गेलं मात्र मुंबईतले रस्ते खड्डेमुक्त झाले नाहीत. असं आदित्य म्हणाले. तर मुंबईत सुरु असलेल्या रस्त्यांच्या खोदकामावरुन आदित्य यांनी सरकारला टोला लगावला. मुंबई महानगरपालिका एवढ्या मोठ्या प्रमाणात रस्ते खोदत आहे की त्यांना खोदकामात काही तरी सापडणार असावं असं वाटतं, असं आदित्य म्हणाले.

# बुलेट ट्रेनच्या मार्गावरील बेकायदा इमारत हातोडा...

## कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांसह पथकाला धक्काबुक्की, विरोध मोडीत काढत पालिकेची कारवाई

**ठाणे :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या मार्गात अडसर ठरत असलेली शीळ परिसरातील तळ अधिक एक मजली बेकायदा इमारतीवर ठाणे महापालिकेने सोमवारी पोलिस बंदोबस्तात हातोडा मारला. या कारवाईला सुरूवातीला विरोध झाला आणि यादरम्यान पालिका तसेच पोलिस अधिकाऱ्यांना धक्काबुक्की झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण होते. मात्र, पालिकेने विरोध मोडीत काढत इमारतीचे बांधकाम पाडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्वकांक्षी प्रकल्प म्हणून मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन हा प्रकल्प ओळखला जातो.

ठाणे महापालिका क्षेत्रातील शीळ, डवले, पडले, देसाई, आगासन, बेतवडे आणि म्हातार्डी या गावातून बुलेट ट्रेनचा मार्ग जाणार असून म्हातार्डी येथे बुलेट ट्रेनचे स्थानक उभारले जाणार आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी राष्ट्रीय हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एनएचएसआरसीएल) माध्यमातून प्रकल्पासाठी जागा हस्तांतराची प्रक्रिया गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. यामध्ये महापालिकेच्या मालकीची शिळ भागातील जागा बाधित होणार आहे. त्यास पालिकेने यापुर्वीच हिरवा कंदील दाखविला



आहे. या प्रकल्पाच्या कामातील अडथळे दूर करण्याचे काम शासकीय यंत्रणांमार्फत गेल्या काही वर्षांपासून सुरू असतानाच, या प्रकल्पाच्या मार्गावर शीळ येथे बेकायदा इमारत उभारण्यात येत असल्याची बाब पालिकेच्या निदर्शनास आली. या इमारतीचे तळ अधिक एक मजली बांधकाम झाले होते. ६० .२५ मीटर क्षेत्रावर हे बांधकाम करण्यात आले होते. या बांधकामावर सोमवारी सकाळी ठाणे महापालिका उपायुक्त मनीष जोशी आणि महसुल विभागाच्या मंडळ अधिकारी सपना चौरे, नितीन पिंगळे (तलाठी) आणि मुब्रा मंडळ तलाठी यांच्या माध्यमातून कारवाई सुरू करण्यात आली. या कारवाईला सुरूवातीला विरोध झाला. त्यानंतर विरोध मोडीत काढत ही कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान, पालिका अधिकारी जोशी आणि पोलिस अधिकाऱ्यांना धक्काबुक्की झाल्याचे सुत्रांनी सांगितले.

बुलेट ट्रेनच्या मार्गावरील शीळ परिसरात तळ अधिक एक मजली बेकायदा इमारत उभारण्यात आली होती. त्यावर आणखी एक मजला उभारणीचे काम सुरू होते. या इमारतीवर कारवाई होऊ नये म्हणून येथील सदनिकांमध्ये काही नागरिकांनी ठाण मांडले होते. या इमारतीत ते वास्तव्य करीत असल्याचे चित्र उभे करण्यात आले होते, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली.

## लाचेप्रकरणी जीएसटी उपायुक्तांवर गुन्हा दाखल



**ठाणे :** पालघर येथील एका व्यवसायिकाला वस्तू आणि सेवा करातील (जीएसटी) दंड कमी करुन देण्यासाठी त्यांच्याकडून १५ लाख रुपयांची मागणी केल्याप्रकरणी जीएसटी विभागाचे उपायुक्त तात्यासाहेब ढेरे आणि एका खासगी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. खासगी व्यक्तीला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक (एसीबी) विभागाने ताब्यात घेतले आहे. तर ढेरे यांचा शोध सुरू आहे. पालघर येथे ५२ वर्षीय व्यवसायिकाची कंपनी आहे. त्यांच्या कंपनीमध्ये उत्पादित केलेल्या वस्तूंच्या खरेदी विक्री बाबत त्यांना दंडासह वस्तू आणि सेवा कर आकारण्यात आली होती. ही रक्कम कमी करुन देण्यासाठी एकनाथ पेडणेकर या खासगी व्यक्तीने उपायुक्त तात्यासाहेब ढेरे यांच्यासाठी १५ लाख रुपयांची मागणी व्यवसायिकाकडे केली होती. याप्रकरणी २८ फेब्रुवारीला व्यवसायिकाने ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. रविवारी पेडणेकर याने व्यवसायिकाला १५ लाख रुपये घेऊन अंधेरी येथील चीमतपाडा येथील एका उपाहारगृहात बोलावले. त्यानुसार, ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याठिकाणी सापळा रचला. तेथे १५ लाख रुपयांची लाच घेताना पेडणेकर याला पथकाने ताब्यात घेतले. तर ढेरे यांचा पोलीस पथकाकडून शोध शुरू आहे.

# देयक थकविल्याने कंत्राटदारांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**ठाणे :** राज्य सरकारच्या वतीने सुरू असलेल्या प्रकल्प सुरू आहेत. परंतु या प्रकल्पांमध्ये विविध कामांसाठी कंत्राटदारांची देयके थकविल्याने सोमवारी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने ठाण्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग ते ठाणे जिल्हाधिकार्यालयापर्यंत पायी मोर्चा काढला होता. या मोर्चामध्ये कंत्राटदार आणि त्यांचे कर्मचारी सहभागी झाले होते. निषेध व्यक्त करण्यासाठी मोर्चेकऱ्यांनी प्रतिकात्मक तिजोरी देखील आणली होती. अर्थमंत्री अजित पवार या तिजोरीचे दार उघडा, अशी मागणी यावेळी मोर्चेकऱ्यांनी केली.



राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्राम विकास जलजीवन मिशन, जलसंधारण, स्थानिक स्वराज्य संस्थांची विकास कामे सध्या ठाणे जिल्ह्यात सुरू आहेत.

परंतु अनेक कामांची देयके अद्यापही कंत्राटदारांना पूर्णपणे मिळालेली नाहीत. देयक थकविल्याने अखेर सोमवारी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने बाजारपेठेतील सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय ते कोर्टनाका येथील ठाणे जिल्हा कार्यालयापर्यंत पायी मोर्चा काढला होता. राज्यातील सर्व विभागाकडील कामे मंजूर करण्यापूर्वी त्या कामांना निधीची उपलब्धता असल्याशिवाय शासनाने कामांसाठी कोणतीही निविदा प्रक्रिया राबवू नये अशी मागणी कंत्राटदारांनी केली.

मागील दोन वर्षांपासून राज्यातील सर्व कंत्राटदार मेटाकुटीला आले आहेत. अनेकदा निवेदने, निदर्शने केली आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. त्यावेळेस आम्हाला आश्वासन देण्यात आले होते. मात्र, त्याची पूर्तता करण्यात आलेली नाही. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तरी लक्ष द्यावे.

तसेच उपमुख्यमंत्री तथा अर्थ मंत्री अजित पवार यांनी आता तरी तिजोरीचे दार उघडावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे विभागीय अध्यक्ष मंगेश आवळे यांनी केले. कंत्राटदारांचे प्रश्न व अडचणी सोडविण्यासाठी शासन, मंत्री व प्रशासनाकडून सरकारी स्तरावर काहीही प्रयत्न होत नाही असा आरोपही महासंघाने केला.

# घोडबंदर रस्त्यावर मिक्सर ट्रकचा अपघात

## सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

**ठाणे :** घोडबंदरहून ठाणेच्या दिशेकडे एक मिक्सर ट्रक चालक सोमवारी प्रवास करत होता. वाघबीळ पुलाजवळ त्याचा ट्रक येताच त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रक दुभाजकाल धडकून अपघात झाल्याची घटना उघडकीस आली आहे. सुदैवाने या घटनेत कोणतिही जीवितहानी झाली नाही. परंतु, या अपघातामुळे या मार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र होते.

एक अज्ञात सिमेंट मिक्सर ट्रक चालक सोमवारी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास घोडबंदरहून ठाणेच्या दिशेने प्रवास करत होता. हा ट्रक चालक वाघबीळ पुलाजवळ येताच, चालकाते ट्रकवरील



नियंत्रण सुटले आणि ट्रक रस्त्यावरील दुभाजकाला धडकला. या ट्रकचा पुढील भाग दुभाजकामध्ये अडकला होता. सुदैवाने या अपघातात कोणालाही दुखापत झाली नाही. परंतु, ट्रक दुभाजकामध्ये अडकल्यामुळे याठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती. ऐन सकाळच्या सुमारास हा अपघात झाल्यामुळे कामाला जाणाऱ्या नागरिकांना या वाहतूक कोंडीचा फटका बसला. ते बराच वेळ या कोंडीत अडकून राहिल्यामुळे त्यांना कार्यालयात पोहोचण्यास उशिर झाला. या अपघाताची माहिती ठाणे शहर वाहतूक पोलिसांना मिळताच, त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. हे अपघातग्रस्त वाहन वाहतूक पोलीस कर्मचारी यांनी पंधरा ते वीस मिनिटात रस्त्याच्या एका बाजूला करण्यात आले. त्यानंतर, घोडबंदर - ठाणे मार्गावरील वाहतूक सुरळीत झाली, अशी माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली.

# मजीप्रा कार्यालयाच्या दस्त खोलीला आग

**बदलापूर :** बदलापुरातील मांजर्ली भागात असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयातील दस्त खोलीला आग लागल्याची घटना सोमवारी समोर आली. शॉर्ट सर्किटमुळे ही लागली असण्याची शक्यता व्यक्त केली जाते आहे. मात्र कागदपत्रांचे यापूर्वीच संगणकीय प्रणालीत रूपांतर करण्यात आल्याने कामकाजावर परिणाम होणार नसल्याची माहिती प्राधिकरणाच्या वतीने देण्यात आली आहे. बदलापूर पश्चिमेतील मांजर्ली भागात बदलापूर कल्याण मार्गावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यालय आहे.

या कार्यालयातून संपूर्ण पाणी पुरवठा यंत्रणेचा गाडा हाकला जातो. सोमवारी सकाळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयातील दस्त खोलीला आग लागली.



याबाबत माहिती मिळताच कुळगाव बदलापूर नगर पालिकेच्या मांजर्ली अग्निशमन केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत ही आग विझवली. या आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी वा कुणीही जखमी झालेले नाही. मात्र दस्त खोलीतील कागदपत्रे जळून खाक झाली असल्याची प्राधिकरणाच्या वतीने देण्यात आली आहे. ज्या खोलीला आग लागली ती कार्यालयाच्या शेवटच्या बाजूला असून त्यामध्ये उपयोगी नसलेल्या जुने दस्तऐवज होते.

कोणताही कर्मचारी या खोलीत कार्यरत नव्हता, असे सागंण्यात आले. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सर्व जुन्या दस्तऐवजांची माहिती संगणकीय प्रणालीतही संकलित केल्याने त्याचा कामकाजावर परिणाम होणार नसल्याचेही प्राधिकरणाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## फलाटाच्या पत्र्यावरील कचऱ्याला आग लागल्याने काही काळ रेल्वे सेवा ठप्प

# ठाणे स्थानकातील फलाट क्रमांक एक आणि दोन वरील घटना

**ठाणे :** स्थानक परिसरातील फलाट क्रमांक दोन वरील पत्र्यावर असलेल्या पालापाचोळ्याला आणि बाजूला असलेल्या झाडाला सोमवारी आग लागल्याची घटना उघडकीस आली आहे. यामुळे फलाट क्रमांक १ आणि २ वरील रेल्वे गाड्या दहा मिनिटांसाठी बंद ठेवण्यात आल्या होत्या. यामुळे प्रवाशांची फलाटावर काही काळ गर्दी झाली होती.

ठाणे स्थानक मधील फलाट क्रमांक एक आणि दोन हे दोन्ही फलाट एकमेकांना लागूनच आहेत. फलाट क्रमांक १



वरुन मुंबईकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्या धावतात. तर, दोन वरुन कर्जत - कसाऱ्याकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्या धावतात. या स्थानकांवरील पत्र्यावर असलेल्या पालापाचोळ्याला आणि बाजूला असलेल्या झाडाला सोमवारी संध्याकाळी ४.१५ वाजताच्या सुमारास आग लागली होती. या घटनेची माहिती मिळताच, घटनास्थळी स्थानक मास्तर, रेल्वे पोलीस कर्मचारी, आपत्ती व्यवस्थान विभागाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान अग्निशमन वाहनासह उपस्थित होते. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. आग लागल्यामुळे फलाट क्रमांक १ वरील आणि २ वरील रेल्वे गाड्या दहा मिनिटांसाठी बंद ठेवण्यात आल्या होत्या. ही आग ४ वाजून ४० मिनिटाच्या सुमारास अग्निशमन दलाच्या जवानांकडून आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने पूर्णपणे विझविण्यात आली. त्यानंतर,फलाट क्रमांक एक आणि दोन वरची रेल्वेसेवा सुरळीत करण्यात आली.

# कल्याणमधील गौरीपाडा, गोदरेज हिल भागातील पाच जणांवर बेकायदा बांधकामप्रकरणी गुन्हे

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील गौरीपाडा आणि गोदरेज हिल भागात बेकायदा बांधकाम करणाऱ्या दोन वेगळ्या बेकायदा बांधकामांमधील एकूण पाच जणांवर कल्याण डोंबिवली पालिकेच्या ब प्रभागाच्या अधिकाऱ्यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाने (एमआरटीपी) फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.

कल्याण डोंबिवली पालिकेच्या ब प्रभागाचे अधीक्षक भूषण कोकणे यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की गोदरेज हिल भागात पटेल आर मार्ट जवळ मोकळ्या जागेत जयराम गणेशा पटेल यांनी एका पत्र्याच्या निवाऱ्याचे बेकायदा बांधकाम केले असल्याची तक्रार कल्याणमधील माहिती कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकर यांनी पालिकेत केली होती.

या तक्रारीच्या अनुषंगाने जयराम पटेल यांना बांधकामाची अधिकृतता सिध्द करणारी कागदपत्रे पालिकेत सादर करण्याची नोटीस बजावण्यात आली होती. ते सुनावणीला हजर राहिले. जमीन मालकी हक्काची कागदपत्रे त्यांनी सादर केली. परंतु, बांधकामाची अधिकृतता सिध्द करणारी, पालिकेकडून देण्यात येणाऱ्या बांधकाम परवानगीची कागदपत्रे ते सादर करू शकले नाहीत. त्यामुळे पटेल यांचे बांधकाम अनधिकृत घोषित करून ते स्वताहून तोडून घेण्याचे बजावण्यात आले होते.

पटेल यांनी निवाऱ्याचे बांधकाम स्वताहून तोडून घेतले नाही. अखेर पालिकेच्या ब प्रभागाच्या तोडकाम पथकाने ते बेकायदा बांधकाम तोडून टाकले. त्यानंतरही तोडलेले बांधकाम पटेल यांनी तीन वेळा पुन्हा




उभारल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. एकच चूक पटेल सतत करत असल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम आणि एमआरटीपीचा गुन्हा दाखल करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला.

दुसऱ्या एका प्रकरणात, मौजे गौरीपाडा योगीधाम भागात एकनाथ भोईर-मानेरकर, गोपीनाथ भोईर, प्रल्हाद भोईर, अशोक भोईर यांनी बेकायदा चाळींचे बांधकाम केले आहे, अशी तक्रार माहिती कार्यकर्ते इंद्रमणी उपाध्याय यांनी पालिकेच्या ब प्रभागात केली होती. ब प्रभागाच्या अधिकाऱ्यांनी या तक्रारीवरून बांधकामधारकांना बांधकामाची अधिकृतता सिध्द करणारी कागदपत्रे दाखल करण्याची नोटीस बजावली.

बांधकामधारकांनी जमिनीची कागदपत्रे सादर केली. पण चाळीच्या बांधकामाची अधिकृतता सिध्द करणारी, पालिकेच्या बांधकाम परवानगीची कागदपत्रे ते पालिकेत सादर करू शकले नाही. त्यामुळे त्यांचे बांधकाम अनधिकृत घोषित करून ते स्वताहून तोडून टाकण्याची नोटीस बांधकामधारकांना बजावण्यात आली. तरीही बांधकामधारकांनी ते बांधकाम स्वताहून काढून घेतले नाही. याऊलट पालिका अधिकाऱ्यांना त्या चाळींमध्ये रहिवास आढळून आला. चाळ रहिवास मुक्त करण्याची नोटीस बांधकामधारकांना बजावण्यात आली आहे.

बेकायदा बांधकाम केल्याप्रकरणी अधीक्षक भूषण कोकणे यांनी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, साहाय्यक आयुक्त सोनम देशमुख यांच्या निदेर्शावरून बांधकामधारकांविरुध्द एमआरटीपीची तक्रार दाखल केली. खडकपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. बेकायदा बांधकामे करणाऱ्यांच्या विरुध्द एमआरटीपीचे गुन्हे दाखल करा, असे आदेश आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी दिल्याने प्रभाग साहाय्यक आयुक्तांनी अशाप्रकारचे गुन्हे दाखल करण्याची मोहीम सुरू केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १03, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com